आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१५ एप्रिल २०२५ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मालमत्ता भाडेपट्ट्यानं देण्यासंदर्भातल्या नियमांमध्ये एकवाक्यता आणण्याचा राज्य सरकारचा निर्णय, नगराध्यक्षांना हटवण्यासाठी सुधारित कार्यपद्धती
- नॅशनल हेरॉल्ड प्रकरणी काँग्रेस नेत्या सोनिया गांधी, राहुल गांधी आणि इतरांविरुद्ध ईडीकडून आरोपपत्र दाखल
- अमेरिकेनं अतिरीक्त आयात शुल्काला स्थगिती दिल्यानं सलग दुसऱ्या सत्रात शेअर बाजारात जोरदार तेजी

**आणि**

- यंदा जून ते सप्टेंबर या कालावधीत सरासरीपेक्षा ५ टक्के अधिक पाऊस पडण्याचा हवामान विभागाचा अंदाज

**<><><><><>**

राज्यातील महानगरपालिकांच्या स्थावर मालमत्ता आणि नगरपरिषदा, नगरपंचायती, औद्योगिक नगरीतील मालमत्ता भाडेपट्ट्याने देण्याच्या नियमांमध्ये एकवाक्यता आणण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. त्यासाठी नवीन दरांबाबत अधिसूचना काढायला आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस होते.

सुधारित नियमानुसार निवासी, शैक्षणिक, धर्मादाय तसंच सार्वजनिक वापरासाठीच्या मालमत्तांचा भाडेपट्टा दर हा रेडी रेकनरच्या तुलनेत अर्धा टक्के पेक्षा कमी असणार नाही. व्यावसायिक आणि औद्योगिक

वापरासाठीच्या मालमत्तेचा बाजारमूल्याच्या ७ दशांश टक्के पेक्षा कमी असणार अशी तरतूद करायला मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

राज्यातल्या नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी क्षेत्रात मालमत्ता करावरचा दंड अंशतः माफ करून कर वसुलीसाठी अभय योजना लागू करण्याचा निर्णय राज्यसरकारनं घेतला आहे.

राज्यातल्या नगर परिषदा, नगरपंचायती, औद्योगिक नगरींच्या अध्यक्षांना पदावरून दूर करण्याच्या अधिनियमात सुधारणा करायला आणि अध्यादेश काढण्याला आज मंत्रिमंडळाने मान्यता दिली. यापुर्वी नगराध्यक्षांना पदावरुन दूर करण्याच्या प्रक्रियेत निवडून आलेल्या सदस्यापैकी पन्नास टक्के सदस्यांच्या सह्यांचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवला जात असे. त्यानंतर शासनस्तरावर अध्यक्षांना पदावरून दूर करण्याची कार्यवाही केली जात असे. त्याऐवजी आता अध्यक्षांना पदावरून हटवण्यासाठी निवडून आलेल्या सदस्यांना अधिकार दिले जाणार आहेत. त्यानुसार निवडून आलेल्या सदस्य संख्येपैकी दोन तृतीयांश संख्येने सदस्यांच्या सह्यांचा प्रस्ताव पाठवला जाईल. ज्यावर जिल्हाधिकाऱ्यांना दहा दिवसांच्या आता विशेष सभा आयोजित करून मतदानाद्वारे निर्णय घ्यावा लागेल.

कोठडीत कैद्याचा मृत्यू झाल्याप्रकरणी भरपाई देण्याच्या धोरणालाही आज मंजुरी देण्यात आली. त्यानुसार कारागृहामध्ये काम करताना झालेल्या अपघातामुळे, किंवा प्रशानाच्या निष्काळजीपणामुळे मृत्यू झाल्यास आणि संबंधित प्रकरणात प्रशासनाचा निष्काळजीपणा चौकशीतून सिद्ध झाल्यास, मरण पावलेल्या कैद्याच्या वारसांना पाच लाख रुपयांची भरपाई दिली जाणार आहे. कैद्याने आत्महत्या केली असल्यास वारसांना एक लाख रुपयांची

भरपाई देण्यात येणार आहे. मात्र नैसर्गिक मृत्यू किंवा तुरुंगातून पळून जाण्याचा प्रयत्न करताना अपघात होऊन मृत्यू झाल्यास कोणतीही भरपाई देण्यातयेणार नाही असं शासनाने स्पष्ट केलं आहे.

<><><><>

राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी आज नवी दिल्ली इथं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. यावेळी राज्यपालांनी प्रधानमंत्र्यांशी महाराष्ट्राच्या विकासासह विविध विषयांवर चर्चा केली.

<><><><>

नॅशनल हेरॉल्ड प्रकरणी सक्तवसुली संचालनालयानं मनी लाँड्रिंगच्या आरोपाखाली काँग्रेस नेत्या सोनिया गांधी, राहुल गांधी आणि इतरांविरुद्ध आरोपपत्र दाखल केलं आहे. विशेष न्यायाधीश विशाल गोगणे यांनी या आरोपपत्राची तपासणी केली आणि पुढची प्रक्रिया येत्या २५ तारखेला होईल, असं सांगितलं. आरोपपत्रातल्या इतर नावांमधे काँग्रेसनेते सॅम पित्रोदा आणि सुमन दुबे यांचा समावेश आहे.

<><><><>

दिव्यांग युवकांच्या कौशल्य विकास आणि तांत्रिक प्रशिक्षणासाठी आज तीन सामंजस्य करार झाले. यात श्री श्री रुरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, स्नायडर इलेक्ट्रिक इंडिया फाउंडेशन, तसंच व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालय यांच्यात त्रिपक्षीय सामंजस्य करार झाला.

<><><><>

गृह विभागाच्या पडिक जागांचा काही भाग विकून तिथं गृहविभाग, सिडको, किंवा गृहनिर्माण संस्थांच्या मदतीनं पोलीस बांधवांसाठी घरबांधणी

करण्याचा पर्याय विचाराधीन असल्याचं गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी आज सांगितलं. नवी मुंबई पोलीस आयुक्तालयानं पोलीसांच्या पाल्यांसाठी आयोजित केलेल्या रोजगार मेळाव्याच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

<><><><><>

अमेरिकेनं अतिरीक्त आयात शुल्क लादण्याच्या निर्णयाला स्थगिती दिल्यामुळं आजही देशातले शेअर बाजार जोरदार तेजीत होते. सेन्सेक्स आज तब्बल १ हजार ५७८ अंकांनी वधारुन ७६ हजार ७३५ अंकांवर बंद झाला. निफ्टी ५०० अंकांची वाढ नोंदवून २३ हजार ३२९ अंकांवर बंद झाला. यामुळं गुंतवणूकदारांची मालमत्ता सुमारे ११ लाख कोटी रुपयांनी वाढली. गेल्या २ सत्रात सेन्सेक्स सुमारे २ हजार ९०० आणि निफ्टी १ हजार अंकांनी वधारला आहे. दोन्ही निर्देशांक सध्या १५ दिवसातल्या उच्चांकी पातळीवर आहेत.

<><><><><>

राज्यातल्या साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांना द्यायच्या एफआरपीबाबत राज्यशासनानं २१ फेब्रुवारी २०२२ ला जारी केलेला शासननिर्णय रद्द केला आहे. याबाबतचा शासननिर्णय आज जारी करण्यात आला. ऊसाच्या एफआरपीसंदर्भात शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी आणि इतरांनी उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवर उच्च न्यायालयानं २७ मार्च २०२५ ला दिलेल्या आदेशामुळे २१ फेब्रुवारी २०२२ चा शासननिर्णय रद्द केला आहे. सध्या ऊसउत्पादक शेतकऱ्यांना एफआरपी देण्याबाबत त्या शासननिर्णयापूर्वीची कार्यवाही अंवलंबावी, असं आजच्या शासननिर्णयात म्हटलं आहे.

**<><><><><>**

राज्यातला ऊस गाळप हंगाम अंतिम टप्प्यात असून, बहुतांश कारखान्यांनी ऊस गाळप बंद केलं आहे. यंदाच्या गाळप हंगामासाठी ३१ मार्चअखेर साखरेचं उत्पादन ८० लाख २६ हजार टनपर्यंत पोहोचलं आहे, मागील हंगामाच्या तुलनेत या वर्षी साखरेचं उत्पादन सुमारे ३० लाख मेट्रिक टन कमी आहे. साखर आयुक्तालयाच्या अहवालानुसार राज्यातल्या एकूण १९२ साखर कारखान्यांनी ऊस गाळप समाप्त केलं असून, यामध्ये पुण्यातील २८कारखान्यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

पोषण पंधरवड्याच्या निमित्तानं चंद्रपूर जिल्ह्यात विविध कार्यक्रम आणि उपक्रम राबवले जात आहेत. याबद्दल अधिक माहिती घेऊया नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या डॉक्टर ज्योती डांगे यांच्याकडून...

**होल्ड... बाईट- ज्योती डांगे**

**<><><><><>**

जल व्यवस्थापनाबाबत जनजागृती व्हावी या हेतूसाठी लातूर जिल्ह्यात जल व्यवस्थापन कृती पंधरवड्याला आजपासून सुरूवात झाली. पाण्याची उपलब्धता आणि योग्य वापर याबाबत जनजागृती आवश्यक आहे. तसंच जलसंवर्धनाचं महत्व नागरिकांना समजून सांगण्यासाठी विविध उपक्रम राबवण्याची गरज असल्याचं यावेळी जिल्हाधिकारी वर्षा ठाकुर यांनी सांगितलं.

**<><><><><>**

एसटीतल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे मार्च महिन्याचं थकित वेतन बँक खात्यात जमा झाल्याची माहिती एसटी महामंडळानं दिली आहे. यापूर्वी त्यांना केवळ ५६ टक्के पगार दिला होता.

<><><><><>

यंदा जून ते सप्टेंबर या कालावधीत सरासरीच्या ५ टक्के अधिक पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. भारतीय हवामान विभागाचे महासंचालक डॉक्टर मृत्यूंजय मोहपात्रा यांनी नवी दिल्ली इथं पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यावर्षी पाऊस सरासरीच्या १०५ टक्के होण्याचा अंदाज आहे.देशातल्या अनेक भागात सामान्य ते सामान्यापेक्षा अधिक पाऊस पडेल, तसंच ईशान्य आणि वायव्य भारतात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

<><><><><>

येत्या दोन दिवसांत कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्या तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. परवा, १७ एप्रिल रोजी विदर्भात काही ठिकाणी पाऊस पडेल, तसंच मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता आहे.

कोकणात बऱ्याच ठिकाणी तर मराठवाड्यात काही ठिकाणी कमाल तापमानात सरासरीच्या तुलनेत किंचित वाढ झाली आहे. अकोला इथं राज्यातलं सर्वात जास्त कमाल तापमान ४३ अंश सेल्सिअस इतकं नोंदवल्याचं हवामान विभागानं कळवलं आहे.

//<><><><><>//